**सुधारित तात्पुरती जेष्ठता यादी**

क्रमांक/यजिप/साप्रवि/आस्था-४/१६२० /२०१९
यवतमाळ जिल्हा परिषद,यवतमाळ
(सामान्य प्रशासन विभाग)
यवतमाळ दिनांक :- १०/८/२०१९

प्रति,

श्री/श्रीमती----------------------------
कनिष्ठ सहाय्यक

विषय :- **कनिष्ठ सहाय्यक या संवर्गाची दिनांक १/१/२०१९ ची सुधारित तात्पुरती जेष्ठता सुची प्रसिध्द करण्याबाबत.**

संदर्भ :- १) शासन अधिसूचना ग्राम विकास व जलसंधारण विभाग, दि.२०.०१.१९८६ महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (सेवाप्रवेशोतर परिक्षा) नियम १९८५

२) शासन अधिसूचना,ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्रमांक-सेप्रप-११९४/ सीआर-१५१२/१३, दिनांक २४/५/१९९९

३) महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग निर्णय क्रमांक:एसआरव्ही-२०११/प्र.क्र.२८४/१२ दि.२१/१०/२०११

४) महाराष्ट्र शासन ग्राम विकास विभाग परिपत्रक क्रमांक:सेवाजे-२००८/प्र.क्र.३९/आस्था-१० दि.३१ मार्च २०१७

५) या कार्यालयाचे पत्र क्रमांक/यजिप/साप्रवि/आस्था-४/१४८६/२०१९ दि.२८/६/२०१९

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने, संदर्भीय क्रमांक ४ अन्वये कनिष्ठ सहाय्यक या संवर्गाची दिनांक १/१/२०१९ ची तात्पुरती जेष्ठता सुची याव्दारे प्रसिध्द करण्यात येवून त्यावर हरकती/आक्षेप असल्यास ७ दिवसांचे आत मागविण्यात आले होते. त्याअनुषंगाने आक्षेपांची संख्या विचारात घेता,पुनश्च दि.१/१/२०१९ ची सुधारित तात्पुरती जेष्ठता यादी याव्दारे प्रसिध्द करण्यात येत आहे. तसेच यावर काही हरकती/आक्षेप असल्यास यादी प्रसिध्द केल्याच्या दिनांकापासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरुपात आक्षेप आवश्यक त्या दस्तऐवज/पुराव्यासह या कार्यालयास सादर करावे. विहीत कालावधीत हरकती/आक्षेप प्राप्त न झाल्यास त्याचा विचार केल्या जाणार नाही, याबाबत नोंद घ्यावी.

तसेच सदर जेष्ठता सुची www.zpyavatmal.gov.in या यवतमाळ जिल्हा परिषदेच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात येत आहे.

**सहपत्र :- १/१/१९ ची सुधारित तात्पुरती सुधारित जेष्ठता यादी.**

**उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा)**
**जिल्हा परिषद,यवतमाळ**

प्रत,

१)मा.मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद,यवतमाळ यांना माहितीकरिता सविनय सादर.

प्रतिलीपी :-

१)------------------------------------------ जिल्हा परिषद,यवतमाळ
२) गट विकास अधिकारी,पं.स.--------------------
३) उपअभियंता,जि.प.बांधकाम/सिंचन/पाणीपुरवठा उपविभाग--------------
४) वैद्यकीय अधिकारी,प्रा.आ.केंद्र----------------
५) मुख्याध्यापक,जि.प.हाय.------------------

जेष्ठता सुचीतील माहिती बरोबर आहे किंवा नाही याची खात्री कार्यालय प्रमुखांनी करावी.तसेच सदर जेष्ठता सुची यवतमाळ जिल्हा परिषदेच्या संकेतस्थळ www.zpyavatmal.gov.in वर प्रसिध्द करण्यात आलेली असल्याचे सर्व कनिष्ठ सहाय्यकास आपल्या स्तरावरुन लेखी कळवून त्याबाबतची पोच घेण्यात यावी.जेष्ठता सुची पाहावयास मिळाली नाही,अशी एकही तक्रार प्राप्त होणार नाही,याची दक्षता घ्यावी.

**उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा)**
**जिल्हा परिषद,यवतमाळ**